पुण्यनगरी पृ.५-१०

# मीरा रोडमध्ये विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल

## स्थानिक रहिवाशांचा झाडे तोडण्यास विरोध



। मीरा रोड । मीरा रोडच्या शांतीनगर परिसरातील विकासकामांच्या नावाखाली आधीच असंख्य झाडे तोडली आहेत. आता पुन्हा विकासकामे सुरू करायची आणि झाडांची कत्तल करायची, असा प्रश्न उपस्थित करत ही झाडे तोडण्यास रहिवाशांनी विरोध केला आहे. रहिवाशांचा मोकळा श्वास हिरावून घेणारा कारभार महापालिकेने बंद करावा, असे रहिवाशांनी सांगत झाडे तोडण्यास विरोध केला. या विरोधात रहिवाशांनी स्वाक्षरी मोहीम राबवली आहे.

मीरा रोडमधील शांतीनगर हे शहरातील सर्वात मोठे व जुने गृहसंकुल आहे. या संकुलातील रस्ता रुंद करणे तसेच गटार बांधण्याच्या नावाखाली महापालिकेने यापूर्वीदेखील जुनी व मोठ मोठी झाडे तोडली आहेत. आता पुन्हा गटार बांधायचे म्हणून महापालिकेने ४० झाडे तोडण्याचा घाट घातला आहे. या वेळी झाडे तोडण्यासाठी आलेल्यांना रहिवाशांनी विरोध केल्यामुळे झाडे तोडण्याची कार्यवाही तूर्तास थांबवण्यात आली आहे. झाडे तोडण्याच्या विरोधात स्थानिक रहिवासी असलेल्या डॉ. नयना वसाणी, दृष्टी घाग, दिलीप घाग, प्रमोद दर्जी, नरेश जैन, मिलन भट, विनोदा कोटिया आदींनी सेक्टर १० च्या स्वामीनारायण मंदिराबाहेर सह्यांची मोहीम राबवली. या वेळी स्थानिक नागरिकांनी सहभागी होत मोठ्या प्रमाणात सह्या केल्या आहेत. झाडे तोडू नये यासाठी महापालिकेत अनेक तक्रारी देऊनसुद्धा महापालिका दाद देत नसल्याने रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे. ठेकेदारांच्या फायद्यासाठी पुन्हा पुन्हा गटारचे काम काढले जाते व त्यासाठी झाडांचा बळी दिला जातो. गटार मोठी करून फेरीवाल्यांना बसवायचे आहे का? विकासाच्या नावाखाली झाडे तोडायची हे सहन करणार नाही, असे सांगत रहिवाशांनी झाडे तोडण्यास विरोध केला आहे. झाडे मोठी व्हायला किती तरी वर्ष लागतात. कोरोना काळात ऑक्सिजन मिळत नव्हता त्यामुळे अनेक नागरिकांचा मृत्यू झाला. आम्हाला घराजवळ ऑक्सिजन देणारी व कार्बन शोषून घेणारी झाडे हवी आहेत. तुमचा पैसेखाऊ विकास नको. शांती नगरच्या लोकांनी स्वच्छ ऑक्सिजनसाठी काय नॅशनल पार्क, उत्तन, गोराईला जायचे का? असा सवाल या वेळी डॉ. नयना वसाणी, दृष्टी घाग यांनी उपस्थित केला.

पुण्यनगरी पा.नं.३.

# कोविड परिस्थिती नियंत्रणात; घाबरू नका!

## राज्यातील कोविड परिस्थितीचा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा



**। नागपूर ।** जगातील कोरोना उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातदेखील खबरदारी घेण्यात येत आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन करतानाच सर्व पालकमंत्र्यांनी आपापल्या जिल्ह्यांमध्ये आरोग्य सुविधा सज्ज राहतील याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मुख्य सचिवांनी देखील तातडीने सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधून कोविड अनुरूप वर्तन पंचसूत्रीचे काटेकोर पालन होईल, हे पाहण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिले.

मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी विधानभवनात विशेष बैठकीत राज्यातील कोविड परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आदी यावेळी उपस्थित होते.

राज्यातील कोविड परिस्थिती पूर्ण नियंत्रणात असली तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर मात्र चीन, जपान, अमेरिका, ब्राझिल या देशांमध्ये रुग्ण वाढताना दिसत आहेत. चीनमध्ये कोविड विषाणूचा बीएफ-७ हा प्रकार अधिक वेगाने वाढताना आढळत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील जनुकीय क्रमनिर्धारण व्यवस्थेची माहिती आणि आढावा यावेळी घेण्यात आला. आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. संजय खंदारे यांनी कोविड परिस्थितीबाबत सादरीकरण केले. राज्यात सध्या २,२१६ कोविड रुग्णालये असून १ लाख ३४ हजार विलगीकरण खाटा असल्याचे यावेळी सांगण्यात आले. चाचण्या, ट्रॅकिंग, उपचार, लसीकरण आणि कोविड अनुरूप वर्तन अशी पंचसूत्री राबवण्याचे केंद्र शासनाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार सर्व जिल्ह्यांमध्ये पंचसूत्रीची अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

### पंचसूत्री पाळा – आरोग्यमंत्री

कोरोनाच्या पार्श्वभूमिवर आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी विधानसभेत निवेदन देताना घाबरून जाण्याचे कारण नाही. यापूर्वी पाळलेल्या पंचसूत्रीचा वापर करा. लहान मुले आणि वृद्धांची काळजी घ्यावी, असे आवाहन केले. निवेदनात सावंत म्हणाले, दोन दिवसांपासून यामध्ये टेस्टिंग, ट्रॅकिंग, ट्रिटमेंट, व्हॅक्सिनेशन आणि कोविड अनुरूप वर्तणूक याचा समावेश होता. हीच पंचसूत्री परत अमलात आणली जात आहे. सध्या महाराष्ट्रात ९५ टक्के लसीकरण झाले आहे. मात्र कुणी तरी बातम्या पेरत राहते आहे की, कोरोना परत आला आहे. चीनमध्ये उद्रेक माजलेला आहे.

पुण्यनगरी पा.नं.१२.

# नागरिकांना वेठीस धरण्यासाठी कायद्याचा गैरवापर करू नका

## उच्च न्यायालय : राज्य सरकारला २५ हजारांचा दंड



**। मुंबई ।** पोलीस ठाण्याचा फोटो काढल्याने हेरगिरीचा गुन्हा दाखल करणाऱ्या सोलापूर पोलिसांना उच्च न्यायालयाने चांगलेच फटकारले. तपास यंत्रणांकडून कायदाचा अनेक वेळा गैरवापर होताना दिसतो. कायद्याचे हत्यार हातात आहे म्हणून कोणत्याही नागरिकाला त्रास देण्यासाठी अथवा छळणूक करण्यासाठी त्याचा वापर होता कामा नये, असे निरीक्षण नोंदवताना उच्च न्यायालयाने सोलापूरच्या नागरिकाला दिलासा दिला. न्यायमूर्ती रेवती मोहिते-ढेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने पोलीस ठाण्याचा फोटो काढल्याने नागरिकविरोधात दाखल केलेला गुन्हा रद्द करून राज्य सरकारला २५ हजारांचा दंड ठोठावला.

सोलापूर येथील रहिवासी असलेल्या रोहन काळेविरुद्ध अकलूज येथील पोलीस ठाण्याचे छायाचित्र काढले म्हणून पोलिसांनी ऑफिशिअल सिक्रेट्स ॲक्टच्या कलम ३ अन्वये गुन्हा दाखल केला. त्याविरोधात रोहन काळेने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करत गुन्हा रद्द करण्याची विनंती केली होती.या याचिकेवर न्यायमूर्ती रेवती मोहिते-ढेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाल्यानंतर राखून ठेवलेला निर्णय जाहीर केला. खंडपीठाने आपल्या निर्णयात पोलिसांच्या गुन्हा दाखल करण्याच्या कार्यपद्धतीवर कडक ताशेरे ओढले. एखाद्या व्यक्तीने पोलीस ठाण्याचा फोटो काढला म्हणून त्याच्याविरुद्ध ऑफिशिअल सिक्रेट्स ॲक्टच्या कलम ३ अन्वये गुन्हा दाखल केला, ही बाबच धक्कादायक आहे. या गुन्ह्याचे अर्जदारावर गंभीर परिणाम होऊ शकतात. अशा प्रकारे गुन्हा दाखल करण्यामुळे एखाद्याच्या प्रतिष्ठेवर, नोकरीवर तसेच एकुणच त्याच्या करिअरवर गंभीर परिणाम होतो. त्यामुळे पोलिसांनी कायद्याच्या गैरवापराकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. एखाद्या व्यक्तीला त्रास देण्यासाठी किंवा त्याला छळण्यासाठी कायद्याचा साधन म्हणून वापर करता कामा नये, असे निरीक्षण नोंदवताना अनेक प्रकरणांमध्ये ओएसएच्या तरतुदींचा गैरवापर केला जात असल्याने रोहन काळेच्या प्रकरणातील आदेशाच्या प्रती पोलीस महासंचालक, मुंबई पोलीस आयुक्त आणि गृह विभागांना पाठवण्याच्या सूचनाही खंडपीठाने केल्या. विनाकारण कुणालाही त्रास देण्यासाठी कायद्याचा गैरवापर केला जाणार नाही, याची खबरदारी घेण्यासाठी न्यायालयाने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना आदेशाची प्रत पाठवण्याचे निर्देश दिले.

खंडपीठाने राज्य सरकारला २५ हजारांचा दंड ठोठावला. ही दंडाची रक्कम काळेच्या विरोधात कारवाईचा बडगा उगारणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.

लोकमत पु.पा.१.

# बँक रोखपालास सव्वातीन लाखांचा गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क
मीरा रोड : भाईंदरमध्ये राहणाऱ्या एका बँकेच्या रोखपालास सायबर लुटारूंनी क्रेडिट कार्डबाबत पडताळणी करायचे सांगून रोखपालाने त्यांची व्यक्तिगत माहिती दिल्यावर त्यांनी ऑनलाइनद्वारे सव्वातीन लाखांना गंडा घातला आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर मार्गावर सागर किरणमध्ये हेमंत मोरे कुटुंबासह राहतात. ते ग्रँटरोड येथील बँक ऑफ इंडियामध्ये रोखपाल पदावर नोकरीला आहेत. ते बँकेत कामावर असताना अनोळखी व्यक्तीने कॉल करून आपण दिल्लीहून क्रेडिट कार्ड विभागातून बोलत असून तुम्ही फेडरल बँकच्या क्रेडिट कार्डसाठी अर्ज केला होता का? तुमचे क्रेडिट कार्ड मंजूर झाले असून पडताळणीसाठी तुमचा पॅनकार्ड क्रमांक, आधार क्रमांक, ईमेल आयडी व मोबाइल क्रमांक द्यावा लागेल असे सांगितले.

मोरे यांनी त्या अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यानुसार पॅनकार्ड, आधार कार्ड व मोबाइल क्रमांक तसेच ईमेल आदी दिले. तुम्हाला क्रेडिट कार्डचा फोटो पाठवतो व त्यावर तुम्हाला क्रेडिट मर्यादा आदी माहिती मिळेल, असे सांगून त्या व्यक्तीने कॉल कट केला. घरी आल्यावर मोरे यांनी त्यांचा मोबाइल पहिला असता त्यांच्या आयडीएफसी फर्स्ट क्रेडिट कार्डमध्ये ३ ओटीपी आले होते. त्यानंतर १ लाख २१ हजार ९७८ रुपये इतकी रक्कम काढण्यात आली होती. थोड्या वेळाने त्यांच्या वन क्रेडिट कार्डमधून २ लाख ३ हजार ३४६ रुपये काढल्याचा संदेश आला. असे एकूण तीन लाख २५ हजार ३२४ रुपयांच्या फसवणूकप्रकरणी २१ डिसेंबरला नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरु केला आहे.

लोकमत पा.नं.५.

## वसईत अल्पवयीन मुलीचे अपहरण

नालासोपारा : वसईत १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. चिंचोटी येथील पाटीलपाडा परिसरात राहणारी मुलगी १९ डिसेंबरला सकाळी आठच्या सुमारास घराशेजारील सार्वजनिक स्वच्छतागृहात गेली होती. मात्र, त्यानंतर ती पुन्हा घरी परतली नाही. तिचा सर्वत्र शोध घेऊनही ती सापडली नाही. या अगोदरही ही मुलगी दोन वेळा बेपत्ता झाली असल्यामुळे घरच्यांनी तिचा सर्वत्र शोध घेऊनही ती न सापडल्याने आरोपीने तिचे अपहरण केल्याचा संशय आल्याने मुलीच्या आईने बुधवारी वालीव पोलीस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणाने घेतला गळफास

नालासोपारा : येथे एका २१ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले आहे. अग्रवाल नंबर-१ येथील शिवदर्शन अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या स्टीवन फर्नांडिस (२१) याने मंगळवारी रात्री घरातील बेडरूममध्ये असलेल्या पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यानंतर त्याला पालिकेच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासल्यावर त्याला मृत घोषित केले. बुधवारी आचोळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

सकाळ पु.पा.१.

# शहरात महिला असुरक्षित

## ११ महिन्यांत ३२० बलात्कार; ४९४ विनयभंगाच्या घटना



प्रसाद जोशी : सकाळ वृत्तसेवा

**वसई, ता. २२ : मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या क्षेत्रात जानेवारी ते नोव्हेंबर या ११ महिन्यांच्या कालावधीत एकूण ३२० बलात्काराचे व ४९४ विनयभंगाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचा तपास विविध पोलिस ठाण्यांनी अधिक जलदगतीने व कुशलतेने केल्याने बलात्काराचे १०० टक्के गुन्हे उघड करण्यात यश आले असले तरी शहरातील महिला समाजात असुरक्षित असल्याचे या आकडेवारीतून समोर येत आहे.**

महिलांना समाजात मोकळा श्वास घेणे या आधुनिक युगातही मुश्कील झाले आहे. कार्यालय, नातेवाईक, कुटुंबातील मंडळी, मित्र, अनोळखी व्यक्ती यांच्याकडून अत्याचाराच्या घटना घडत असतात. त्यामुळे महिला मानसिक तणावाखाली येतात. लग्नाचे प्रलोभन दाखवून शारीरिक संबंध प्रस्तापित करणे किंवा जबरदस्ती करणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात होत असतात. कार्यालयातदेखील अशा घटना घडतात. नातेवाईकच मुलींना वाईट स्पर्श करतात. अनेकदा घरी कोणी नसल्याचा फायदा घेतला जातो. महिलांना धमकावले जाते. अनेक मुली, महिला बदनामीच्या भीतीपोटी शांत राहतात. असह्य होते तेव्हाच आवाज उठवला जातो. असे या सर्व प्रकारच्या गुन्ह्यांवरून लक्षात येते.

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या क्षेत्रात एकूण १६ पोलिस ठाण्यांत बलात्कार व विनयभंगाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. यातील विनयभंगाचे २१ गुन्हे अद्याप उघड झाले नाहीत. बलात्काराचे गुन्हे शंभर टक्के उघड करण्यात पोलिसांना यश आले आहे. बलात्कार करून पळून गेलेल्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. सन २०२१मध्ये विनयभंगाचे प्रमाण कमी होते; परंतु यंदा ते वाढले आहे. त्याचबरोबर बलात्करांच्या गुन्ह्यांमध्येही वाढ झाली आहे.

पेल्हार ३ , वसई २, मिरा रोड २, नवघर माणिकपूर ३ व तुळिंज पोलिस ठाणे २ असे विनयभंगाचे गुन्हे उघड झाले नाहीत. याबाबत पोलिसांकडून अधिक तपास केला जात असून लवकरच हे गुन्हेदेखील उघड होतील, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

| वर्ष | गुन्ह्याचा प्रकार | दाखल गुन्हे | उघड गुन्हे |
|---|---|---|---|
| २०२१ | विनयभंग | ३७७ | ३६५ |
| २०२२ | विनयभंग | ४९४ | ४७३ |
| २०२१ | बलात्कार | २६४ | २६४ |
| २०२२ | बलात्कार | ३२० | ३२० |

समाजात घडणाऱ्या अपप्रवृत्तींना आळा घालण्यासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे. पीडितेला आधार दिला पाहिजे. पीडितेने न डगमगता पुढे येऊन अत्याचाराचा प्रखर विरोध करावा. खचू नये. महिलांनी स्वरक्षणाचे धडे घ्यावेत.
- **निशा मोदी**, संस्थापक, वुमन प्राईड असोशिएशन

संबंधित पोलिस ठाण्यांतील पोलिसांनी तपास करून गुन्ह्यातील आरोपींना पकडत शंभर टक्के गुन्ह्याची उकल केली आहे. विनयभंग प्रकरणांचादेखील छडा लावला आहे.
- **बलराम पालकर**, जनसंपर्क अधिकारी, पोलिस आयुक्तालय

आघातानंतर ताण ही मोठी समस्या आहे. अनेक मुली समुपदेशनासाठी येत असतात त्यांच्यावरील अत्याचारामुळे वाईट स्वप्न, मानसिक ताण येतो. तसेच घटनांचा विरोध करण्यासाठी स्वसंरक्षणाचे धडे महिलांनी घ्यायला हवेत.
- **वंदना पवार**, मानसोपचारतज्ज्ञ

### सर्वाधिक गुन्हे वालीवमध्ये

अकरा महिन्यात सर्वाधिक बलात्काराचे गुन्हे हे वालीव पोलिस ठाण्यात दाखल झाले व त्याची उकल करण्यात आली आहे तर विनयभंगाचे ५१ गुन्हे विरार पोलिस ठाण्यात दाखल असून यातील २ गुन्ह्याचा तपास सुरू असून अन्य ४९ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

समाजविघातक प्रवृत्तीच्या माणसांसाठी कायद्यात दंड आहे. त्यामुळे महिला, मुलींनी पुढे आले पाहिजे. महिलांसाठी जनजागृती शिबिराचे पोलिसांकडून आयोजन केले जाते. पोलिस नेहमी पाठीशी आहेत, त्यामुळे महिलांनी घाबरून जाण्याचे कारण नाही.
- **तेजश्री शिंदे**, अधिकारी, भरोसा सेल

सकाळ फु. पा. 9.

# उत्तन कचरा प्रकल्पातील प्रक्रिया ठप्प

## प्रकल्पाबाहेर गाड्यांच्या रांगा; देयक थकल्याने कंत्राटदाराकडून काम बंद

भाईंदर, ता. २२ (बातमीदार) : मिरा-भाईंदर महापालिकेच्या उत्तन येथील घनकचरा प्रकल्पात ओल्या व सुक्या कचऱ्यावर होणारी प्रक्रिया ठप्प झाली आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या कंत्राटदाराला महापालिकेकडून देयक न मिळाल्याने त्याने कचऱ्यावर प्रक्रिया करणे थांबवले आहे. परिणामी कचऱ्याने भरलेल्या गाड्या प्रकल्पाबाहेरच उभ्या राहिल्या आहेत. हीच परिस्थिती राहिली तर शहरात कचऱ्याचे ढीग साचण्याची भीती व्यक्त होत आहे.



भाईंदर : उत्तन घनकचरा प्रकल्पाबाहेर कचरा गाड्यांच्या रांगा लागल्या आहेत.

शहरात दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर उत्तनच्या धावगी येथील घनकचरा प्रकल्पात प्रक्रिया केली जाते, पण प्रक्रिया करणाऱ्या कंत्राटदाराचे गेल्या चार महिन्यांचे सुमारे सव्वा कोटी रुपयांचे देयक महापालिकेकडे थकल्यामुळे त्याने गुरुवारी सकाळपासून काम बंद केले आहे. त्यामुळे शहरातील कचरा गोळा करून तो प्रकल्पापर्यंत नेणारी वाहने कचरा भरलेल्या अवस्थेत प्रकल्पाबाहेर उभी आहेत. कंत्राटदारासोबत महापालिकेने केलेल्या करारानुसार महापालिकेने साठ दिवसांच्या आत त्याचे देयक देणे बंधनकारक आहे. मात्र कंत्राटदाराचे सुमारे चार महिन्यांचे देयक थकले असल्यामुळे करारातील तरतुदीचा आधार घेत त्याने काम बंद केले आहे. या थकीत असलेल्या देयकातील काही रक्कम कंत्राटदाराला देण्यात आली असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

### दररोज साडेचारशे टन कचरा गोळा

शहरात दररोज सुमारे साडेचारशे टन कचरा गोळा करत असतो. महापालिकेने प्रत्येक प्रभागातील कचरा गोळा करण्यासाठी स्वतंत्र कंत्राटदाराची नेमणूक केली आहे, तर त्यावर प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमला आहे. सौराष्ट्र एन्वायरो या कंत्राटदाराच्या माध्यमातून गोळा झालेल्या कचऱ्यावर उत्तन येथे प्रक्रिया केली जाते. ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती, तर सुक्या कचऱ्याचे तुकडे करून ते जळाऊ इंधन म्हणून विविध कारखान्यांना पाठवले जाते. कचरा गोळा करणाऱ्या कंत्राटदाराकडील सफाई कर्मचारी दिवसातून दोन वेळा कचरा गोळा करतात व तो वाहनांमध्ये भरून प्रकल्पाकडे पाठवतात.

शहरातील कचरा दररोज गोळा करून त्यावर प्रक्रिया करणे हे अत्यावश्यक सेवेत मोडणारे काम आहे. त्यामुळे कंत्राटदाराने कचऱ्यावरील प्रक्रिया बंद करणे चुकीचे आहे. त्याच्या थकीत रकमेतील काही रक्कम देण्यात आली असून प्रकल्प तातडीने सुरू करण्याच्या सूचना कंत्राटदाराला देण्यात आल्या आहेत. त्यानंतरही प्रकल्प सुरू झाला नाही तर कंत्राटदाराला नोटीस बजावण्यात येईल.

- रवी पवार, उपायुक्त, मिरा-भाईंदर महापालिका

लोकसत्ता फु. पा. 3.

# हाणामारीत गोळीबार झाला नव्हता

## वालीव पोलिसांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

विरार : वसईत वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत नाईकपाडा परिसरात दोन गटांत हाणामारी झाली. त्यात तलवारीचा वार करून एकाला जखमी करण्यात आले. त्यानंतर त्यावर गोळीबार करण्यात आला होता. या घटनेत प्रत्यक्षात गोळीबार झाला नव्हता. जखमी व्यक्तीला केवळ बंदुकीचा धाक दाखविण्यात आला होता, असे पोलिसांनी सांगितले. बराह पालन करण्याच्या कारणावरून दोन गटांत वाद निर्माण झाला होता. हाणामारीतील आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. यात एका महिलेस अटक करण्यात आली आहे. चार फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

मंगळवारी वसई पूर्वेला नाईकपाडा परिसरात ही घटना घडली होती.

हरकिशन सिंग असे जखमीचे नाव आहे. तो भीमनगर परिसरात राहतो. हरिकिशनवर हल्ला करणारे चार जण याच परिसरातील असून ते शिकलगार समाजाचे असल्याची माहिती वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांनी दिली.

लोकसत्ता पा.नं.५.

# ‘मेट्रो ९’ मार्गिकेची धाव आता उत्तनपर्यंत

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** दहिसर पूर्व ते मीरारोड या मेट्रो ९ मार्गिकेतील राई, मुर्धा, मोर्वा गावातील कारशेड अखेर उत्तन येथे हलविण्यात येणार असल्याचे हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आले. त्यामुळे आता ११.३८६ किमीची मेट्रो ९ मार्गिका आणखी चार किमीने विस्तारणार असून या मार्गिकेची धाव आता उत्तन येथील खोपरा गावापर्यंत असणार आहे. असे झाल्यास मुंबईकरांना मेट्रोने ‘एस्सेल वर्ल्ड’ आणि ‘पॅगोडा’ला जाणे सोपे होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) अहवालानुसार कारशेड उत्तनला हलविणे अव्यवहार्य ठरविण्यात आले होते. त्यामुळे कारशेड राई, मुर्धा, मोर्वा गावातच होईल, असे एमएमआरडीएकडून अप्रत्यक्षपणे सांगण्यात येत होते. मात्र आता सरकारच्या घोषणेनंतर कारशेड उत्तनला नेण्यासह मार्गिकेचा विस्तार उत्तनपर्यंत करणे अपरिहार्य ठरणार आहे. त्यानुसार लवकरच या दृष्टीने आराखडा तयार करण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे.

सरकारच्या या घोषणेनंतर याविषयी ‘एमएमआरडीए’च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारले असता सरकारचा निर्णय असल्याने त्या दृष्टीने अंमलबजावणी सुरू होईल, असे स्पष्ट केले. सरकारने जाहीर केल्याप्रमाणे कारशेड उत्तनमधील खोपरा गावात हलविण्यासाठी ‘एमएमआरडीए’ला मेट्रो ९ मार्गिका चार किमीने विस्तारित करावी लागणार असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.

## अर्धी लढाई जिंकली...

राई, मुर्धा, मोर्वा कारशेडला येथील ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला होता. यासाठी जनआंदोलन उभे केले होते. मात्र आता कारशेड उत्तनला नेण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र आता केवळ अर्धी लढाई आम्ही जिंकली आहे, अशी प्रतिक्रिया आंदोलनाचे प्रमुख अशोक पाटील यांनी व्यक्त केली आहे. राई, मुर्धा, मोर्वा गावातून जाणाऱ्या मार्गिकेचा मार्ग बदलावा अशीही मागणी आहे, असे ते म्हणाले.

सकाळ पा.नं.३.

# कला-क्रीडा महोत्सवात ६० हजार स्पर्धक सहभागी

## सोमवारपासून रंगणार महोत्सव

विरार, ता. २२ (बातमीदार) : तालुक्यातील विद्यार्थी व नागरिकांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी वसई तालुका कला, क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. कोरोनानंतर होणाऱ्या महोत्सवात यंदा ६० हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला असून ही स्पर्धा २६ ते ३१ डिसेंबर या कालावधीत होणार आहे.

महोत्सवाची सुरुवात २५ तारखेला दुपारी ४ वाजता विरार येथील नानभाट येथून करण्यात येणार आहे. या वेळी ‘ख्रिसमस फिटनेस रन’चे आयोजन करण्यात आले आहे. युवा एशियन गेम्स सुवर्णपदक विजेती धावपटू ईशा जाधव व मास्टर्स स्पर्धेतील सुवर्णपदकविजेते भालाफेक व धावपटू रितेश वर्तक हे या वेळी उपस्थित राहणार आहेत. आमदार क्षितिज ठाकूर यांच्या हस्ते दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी विरार पूर्व स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन केल्यानंतर ही क्रीडा ज्योत विरार, नालासोपारामार्गे वसईच्या नरवीर चिमाजी आप्पा क्रिकेट मैदान येथे पोहचणार आहे. वसई तालुका कला-क्रीडा महोत्सवाचा मुख्य उद्घाटन सोहळा सायंकाळी साडेचार वाजता होणार असून प्रमुख उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध ज्येष्ठ नाट्य-सिनेअभिनेते पद्मश्री मनोज जोशी, रणजी क्रिकेटपटू सर्फराज खान उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवाचे प्रणेते आमदार हितेंद्र ठाकूर हे या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवणार आहेत.

विविध वयोगटांत कला विभागात एकूण ३४; तर क्रीडा विभागात एकूण ३५ प्रकारच्या स्पर्धा होणार असल्याची माहिती गुरुवारी वसईत क्रीडा भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत महोत्सव समितीचे सरचिटणीस प्रकाश वनमाळी यांनी दिली.

पुण्यनगरी पा.नं. १ व ७

### दिशा सालियन प्रकरणावरून गदारोळ

# जयंत पाटील यांचे निलंबन



**नागपूर :** दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची व्यवस्थापक दिशा सालियन हिच्या मृत्यूच्या विशेष चौकशीची मागणी गुरुवारी सत्ताधारी सदस्यांनी लावून धरल्याने झालेल्या प्रचंड गदारोळात विधानसभेचे कामकाज गुरुवारी तब्बल सात वेळा तहकूब करावे लागले. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखेर सदस्यांनी आपल्याकडील माहिती दिल्यास विशेष चौकशी करण्याचे आश्वासन दिले. पण त्या गदारोळात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, आमदार जयंत पाटील यांनी अध्यक्षांसंदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केल्यावरून अधिवेशन संपेपर्यंत त्यांच्या निलंबनाचा ठराव सभागृहात मंजूर करण्यात आला.

प्रश्नोत्तराच्या तासानंतर 'बाळासाहेबांची शिवसेने'चे सदस्य भरत गोगावले यांनी दिशा सालियनच्या ▸▸ पान ७ वर...



सदस्यांनी दिशा सालियन प्रकरणी अधिक माहिती उपलब्ध करून दिल्यास विशेष चौकशी करू.

**- देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री

# जयंत पाटील यांचे निलंबन

**(पान १ वरून)** संशयास्पद मृत्यूचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. या प्रकरणातले पुरावे दडवण्यात आले असून त्याची संपूर्ण चौकशी व्हायला हवी. त्यानंतर भारतीय जनता पक्षाचे आमदार नितेश राणे यांनीही याप्रकरणी विशेष चौकशीची मागणी केली. पोलिसांकडे याबाबत काही माहिती आणि पुरावे असून चौकशीमध्ये कुणाचा दबाव आहे, हे समजले पाहिजे, असे ते म्हणाले. सत्ताधारी बाकांवरूनच त्यानंतर यासंदर्भात आग्रही मागणी आणि गदारोळ होत राहिल्याने कामकाज सात वेळा तहकूब करावे लागले. अखेरीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदस्यांनी याप्रकरणी अधिक माहिती उपलब्ध करून दिल्यास विशेष चौकशी करण्याची तयारी दर्शवली.

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मात्र सत्ताधारी आमदारांकडन दिशा सालियन मृत्यूप्रकरणी विनाकारण राजकारण होत असल्याची टीका केली. या संपूर्ण प्रकरणाचा तपास केंद्र सरकारच्या सीबीआय या संस्थेकडून झाला असून सत्ताधाऱ्यांचा त्यावर विश्वास नाही का? असा प्रश्न त्यांनी विचारला. या विषयावर राजकारण करू नका, अशी मागणी दिशाच्या पालकांनीही केली असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर बोलताना फडणवीस यांनी दिशा प्रकरणात सीबीआयने चौकशी केलेली नाही. सीबीआयने सुशांतसिंह प्रकरणात तपास केला असल्याचे स्पष्ट केले.

पवार यांनी त्यावर शिवसेनेचे (ठाकरे) सदस्य भास्कर जाधव यांना बोलण्याची अनुमती देण्याची मागणी केली. मात्र, अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ती नाकारली. विरोधी सदस्यांनी त्यावरून अध्यक्षांसमोरच्या मोकळ्या जागेत येऊन गोंधळ सुरू केला. जयंत पाटील यांनी त्याचवेळी नार्वेकर यांना उद्देशून काही आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने सत्ताधारी बाजूने त्यांच्या निलंबनाची मागणी केली. त्यावरूनही गदारोळ झाल्याने तीन वेळा कामकाज तहकूब करावे लागले. संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी तेव्हा जयंत पाटील यांना अधिवेशन संपेपर्यंतच्या काळासाठी सभागृहातून निलंबित करण्याचा ठराव मांडला. तो बहुमताने मंजूर झाल्याचे जाहीर करण्यात आले. त्यावर बोलताना पवार यांनी सभागृहात घडलेला प्रसंग अयोग्य असल्याचे सांगत विरोधी पक्षनेता म्हणून दिलगिरी व्यक्त केली. सत्ताधारी आमदारच सभागृहात गोंधळ घालतात. 'नासुप्र'मध्ये झालेला भूखंड घोटाळा आणि त्याप्रकरणी नगर विकास विभागाने दिलेल्या शपथपत्रावरून विरोधक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टीकेचे लक्ष्य करण्याची भीती असल्यानेच सत्ताधाऱ्यांची ही नौटंकी सुरू असल्याची टीका पवार यांनी सभागृहाबाहेर माध्यमांशी बोलताना केली. जाधव म्हणाले, सत्ताधाऱ्यांचे वागणे बेजबाबदारपणाचे आहे. सत्ताधाऱ्यांनी गोंधळ न घालता कामकाज सुरू ठेवायला हवे. त्यांचे वागणे त्याउलट आहे. हा एक प्रकारे लोकशाहीचा खूनच आहे. सीबीआय ही केंद्र सरकारची संस्था आहे. गृहमंत्री अमित शाह हे भाजपमधील वरिष्ठ नेते आहेत. पण त्यांच्या शब्दालाही कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी ज्याप्रकारे कुठलीही किंमत दिली नाही, त्याप्रमाणे इथल्या सत्ताधाऱ्यांचाही सीबीआयवर विश्वास नाही, असे दिसते. भूखंड भ्रष्टाचारप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या शपथपत्रामुळे त्यांचे पितळ उघडे पडले आहे.

लोकमत

# पोलिसांचा इशारा न जुमानता पळ काढाल तर दीड हजाराचा दंड

## पोलिसांचे असते बारीक लक्ष : नियम मोडणाऱ्यांना कारवाईची भीती

रिॲलिटी चेक

**मंगेश कराळे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : रस्त्यावर किंवा महामार्गावर वाहतूक नियमांचे अनेकजण उल्लंघन करतात. अशा नियम मोडणाऱ्या चालकांवर वाहतूक पोलिसांचे बारीक लक्ष असते. अशा नियम मोडणाऱ्या वाहनधारकांना वाहन थांबवण्यासाठी पोलिसांकडून हात दाखवून वाहन थांबविण्याचा इशारा दिला जातो. मात्र, अनेक वाहनधारक कारवाईच्या भीतीने गाडी न थांबवता किंवा गाडी बाजूला न नेता वेगाने गाडी चालवून पोलिसांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करतात. दरम्यान, पोलिसांचा इशारा न जुमानता पळ काढाल तर पाचशेचा दंड ठोठावण्यात येणार असल्याचा इशारा विरार आणि वसई वाहतूक शाखेच्या पोलिसांनी दिला आहे.


वसई आणि विरार या शहरातील अनेक भागात वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी काम करतात.



### पहिल्यांदा पाचशे, दुसऱ्यांदा दीड हजाराचा दंड

पोलिसांच्या इशाऱ्याला न जुमानता वाहन चालविणाऱ्यास ५०० रुपयांचा दंड आकारण्यात येतो. तीच चूक पुन्हा केल्यास किंवा नियम मोडल्यास वाहनधारकास दीड हजाराचा दंड करण्याची तरतूद वाहतूक नियम कायद्यात करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन वाहतूक शाखेच्या पथकाने केले आहे.

### पोलिसांचा इशारा न जुमानता पळ काढणारे




### शक्यतो कागदपत्रे जवळ बाळगावीत

वाहनधारकांनी पोलिसांचा इशारा न जुमानता थांबावे, त्यांनी मागणी केलेली सर्व कागदपत्रे दाखवावीत. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास नियमानुसार दंड भरावा. शक्यतो वाहतूक नियमांचे पालन सर्वांनी करावे. आवश्यक ती कागदपत्रे वाहन चालवताना जवळ बाळगावीत. वाहनधारकांनी वाहतूक पोलिस कर्मचारी, अधिकाऱ्यांशी सौजन्याने वागावे.

- **दादासाहेब करांडे,** पोलिस निरीक्षक, विरार परिमंडळ तीन, वाहतूक विभाग

### ... तर अपघाताची शक्यता

- कारवाईच्या मोहिमेवेळी वाहतूक पोलिस वेगवान वाहनधारकांना गाडी थांबवण्याचा इशारा करतात मात्र, अनेक वाहनधारक अधिक वेगाने वाहन चालवून पोलिसांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करतात.
- **परिणामी वेगात वाहन चालवल्या अनेक वेळा अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. पोलिसांना पाहून पळ काढणाऱ्या अनेक वाहनधारकांचा अपघातही झाल्याची उदाहरणे आहेत.**

### कारवाईची मोहीम तीव्र

- अपघातांची संख्या वाढत असल्याने वाहतूक पोलिसांनी वाहतुकीचे नियम कडक केले आहेत, शिवाय नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर मोठी दंडात्मक कारवाई केली जात आहे.
- अशातच पोलिसांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करणारे वाहनधारक वाढत असल्याने त्या विरोधातील मोहीम तीव्र करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Dec 23, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

अधिकारी-कर्मचाऱ्यांनाच करावा लागतो कौशल्याने तपास

# बॉम्बशोधक अन् श्वान पथक आयुक्तालयाला कधी मिळणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : मीरा-भाईंदर वसई-विरार या शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी १ ऑक्टोबर २०२० साली मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालय सुरू करण्यात आले. पोलिस आयुक्तालय सुरू होऊन दोन वर्षांचा कालावधी झाला आहे. मात्र, अद्यापही पोलिस आयुक्तालयासाठी आवश्यक असणाऱ्या काही गोष्टी उपलब्ध झालेल्या नाहीत. यामध्ये बॉम्बशोधक, नाशक पथक आणि श्वान पथकाचा समावेश आहे.

या पोलिस आयुक्तालयांतर्गत १६ पोलिस ठाणी येतात. आयुक्तालयातील नालासोपारा शहरही मोठ्या प्रमाणात संवेदनशील होत चालले आहे. अशा वेळी पोलिस दलाकडे स्वत:ची सक्षम यंत्रणा असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये आयुक्तालयातील पोलिसांना एखाद्या गोष्टीचा संशय आला किंवा बेवारस वस्तू निदर्शनास आली तर त्याचा तपास करण्यासाठी ठाणे ग्रामीण किंवा शहर पोलिसांच्या बॉम्बशोधक व नाशक पथक आणि श्वान पथकाला पाचारण करावे लागते. या पथकासाठी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधणे, त्यानंतर त्यांची परवानगी, त्यानंतर पथक घटनास्थळी पोहोचण्यासाठी लागणारा वेळ यामध्ये खूप विलंब होतो. त्यामुळे तपास करतानाही अनेक अडचणी येतात. या गोष्टीचा विचार करून आयुक्तालयाला स्वतंत्र बॉम्ब शोधक व नाशक पथक आणि श्वान पथक मिळावे, यासाठी प्रस्ताव पाठविला असल्याचे सूत्रांनी सांगितले.

गुन्हे शोधक, बॉम्ब शोधक आणि अमली पदार्थ शोधक असे श्वान पथकांचे तीन प्रकार आहेत. खून, दरोडा, चोरी, अपहरणाच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याची जबाबदारी या श्वानपथकाकडे असते. एखाद्या ठिकाणी मोठा गुन्हा घडल्यास त्या ठिकाणी तात्काळ श्वानपथकाला पोहचावे लागते. त्यामुळे अन्य पथकाप्रमाणे श्वान पथकही अत्यंत महत्त्वाचे आहे. आजघडीला देशभरात दहशतवादी कारवाया वाढलेल्या आहेत. शिवाय खून, दरोडे, घरफोड्याच्या घटनांमध्येही वाढ झालेली आहे. मीरा-भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतही गुन्हेगारी कमी होताना दिसत नाही.



## आरोपींचा माग काढताना अडचणी

बॉम्ब, अमली पदार्थ शोधण्यासाठी तसेच अनेक गुन्ह्यांमध्ये आरोपींचा माग काढण्यासाठी श्वान पथक महत्त्वाचे आहे. श्वान पथकातील प्रशिक्षित श्वान अनेकदा एखाद्या गुन्ह्याच्या तपासात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. सध्या ठाणे शहर आणि ग्रामीण पोलिसांकडे स्वतःचे श्वान पथक आहे. मात्र, मीरा-भाईंदर वसई विरार पोलिसांकडे अद्यापही हे पथक नाही. त्यामुळे पोलिस दलाने स्वतंत्र श्वान पथकासाठी प्रस्ताव पाठविला असल्याचे सूत्रांनी सांगितले.

Hello Vasai
Page No. 1 Dec 23, 2022
Powered by: erelego.com